मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » बुधवार, दि. 18 डिसेंबर 2024 | पान- 1


# बांगलादेशी, रोहिंग्यांवर होणार कारवाई!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन : आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात लक्ष वेधले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये चिखली-कुदळवाडी भागातील बेकायदेशीर भंगार दुकानचालक आणि बांगलादेशी घुसखोरांवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी आग्रही भूमिका घेतली. सभागृहाचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर या भागातील बांगलादेशी रोहिंग्यांच्या मुद्दा उपस्थित करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रश्न गांभीर्याने घेऊन महापालिका आयुक्त तसेच पोलिस आयुक्तांना त्याबाबत आदेश द्यावेत, तसेच कुदळवाडी, चिखली भागातील कारवाईनंतर होणाऱ्या उद्रेकाबाबतही सतर्क रहावे, असेदेखील म्हटले आहे.




महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरू आहे. त्या निमित्त आमदार महेश लांडगे यांनी महायुती सरकारचे लक्ष वेधले. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून आतापर्यंत बेकायदेशीरपणे शहरात वास्तव्य 70 हून अधिक बांगलादेशी नागरिकांना मूळ देशात परत पाठवले आहे. बनावट आधार कार्ड, पॅनकार्ड आणि पासपोर्ट तयार करुन हे घुसखोर पश्चिम बंगालच्या सीमाभागातून भारतात प्रवेश करतात. रोजगाराच्या निमित्ताने आलेले हे बांगलादेशी देशविघात कृत्यांमध्ये सहभागी असल्याचे समोर आले आहे. बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांची संख्या वाढू लागली असून, त्यांचा बंदोबस्त करण्याची आवश्यकता आहे.

पिंपरी-चिंचवड आणि चाकण, रांजणगाव, तळेगाव आदी एमआयडीसी पट्ट्यात कमी पगारामध्ये काम करण्यासाठी बांगलादेशी घुसखोर सहज उपलब्ध होतात. त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगार मिळत नाही. दुसरीकडे, घुसखोरांचे 'कनेक्शन' देशविघातक कृत्यांमध्ये असल्याचे काही घटनांमध्ये समोर आले आहे. त्यामुळे हा प्रश्न गंभीर बनला आहे.

### कारवाईनंतर उद्रेक होण्याची भीती..

» पिंपरी-चिंचवड पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी शहरातील विविध भागांमध्ये काही दिवसांपूर्वी २३ बांगलादेशी घुसखोरांना अटक केली आहे. बनावट ओळखीच्या आधारे पासपोर्ट काढून देणारे मोठे रॅकेट काही एजंट चालवतात. पिंपरी-चिंचवड, पुणेसह मोठ्या शहरांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचे रॅकेट सक्रिय आहे, हे स्पष्ट होते. म्हणूनच आता पिंपरी-चिंचवड पोलिस व महापालिका प्रशासनाची जबाबदारी वाढली आहे. चिखली कुदळवाडी या परिसरामध्ये तातडीने कोंबिंग ऑपरेशन होऊन येथील समाजविघातक कृत्य घडवून आणू शकणाऱ्या व्यक्ती, प्रवृत्तींना वेळीच गजाआड करणे गरजेचे आहे. अशी कारवाई झाल्यानंतर मोठा उद्रेक होण्याची देखील भीती आहे. या दृष्टीने सतर्कतेने पावले उचलून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

“ कुदळवाडी-चिखली भागातील भंगार गोदामे शहरातील नदी, हवा आणि येथील रहिवासी यांच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरत आहेत. वारंवार येथे आग लागण्याच्या घटना घडतात. मोठ्या प्रमाणात मालमत्तांचे नुकसान होते. पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. या घटनांच्या आडून देशविघात प्रवृत्ती समोर येण्याची भीती आहे. भंगार दुकानांमध्ये बांगलादेशी आणि रोहिंग्या कामगार आहेत. मात्र, त्याची कुठेही नोंद नाही. त्यामुळे वेळीच बांगलादेशी आणि रोहिंग्यांवर लगाम घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे. त्यावर उचित कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री महोदय यांनी दिले आहे.

- महेश लांडगे, आमदार भोसरी विधानसभा, भाजपा.

# इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी दादाभाऊ गावडे

## स्वागताध्यक्षपदी वंदना आल्हाट यांची निवड : 5 जानेवारीला होणार तिसरे इंद्रायणी साहित्य संमेलन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथे संपन्न होणाऱ्या तिसऱ्या इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक दादाभाऊ जयवंत गावडे यांची निवड करण्यात आली आहे. तर स्वागताध्यक्ष म्हणून वंदना हिरामण आल्हाट यांच्या निवडीस मान्यता देण्यात आली. इंद्रायणी साहित्य परिषदेच्या काल झालेल्या कार्यकारिणी बैठकीत संमेलनाचे निमंत्रक ज्येष्ठ साहित्यिक अरुण बोऱ्हाडे यांनी मांडलेल्या प्रस्तावास एकमताने मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी संदीप भानुदास तापकीर होते. ज्येष्ठ साहित्यिक सोपान खुडे यांनी ठरावास अनुमोदन दिले.

दादाभाऊ जयवंत गावडे हे प्रथितयश ग्रामीण साहित्यिक असून 'अजून पहाट झालीच नाही' या त्यांच्या आत्मचरित्राने मराठी



साहित्यात मोलाची भर घातली आहे. त्याशिवाय त्यांचे अनेक कथासंग्रह, कादंबरी आणि कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांचा 'वेलीवरची फुले' हा कवितासंग्रह राज्यसरकारच्या पुरस्काराने गौरविण्यात आलेला असून त्यांच्या अन्य पुस्तकांना विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी प्रथमच एका महिलेची निवड झाली आहे. सौ. वंदना हिरामण आल्हाट या मोशीगावच्या कन्या असून त्यांना वारकरी सांप्रदायाची पार्श्वभूमी आहे. त्यांना सामाजिक कार्याची आवड असून साहित्य, कला संस्कृतीचे जतन व्हावे, यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. मोशी परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या म्हणूनही त्यांचा लौकिक आहे.

इंद्रायणी साहित्य परिषदेच्या काल झालेल्या बैठकीला परिषदेचे सचिव रामभाऊ सासवडे, कार्याध्यक्ष सोपान खुडे, संगीता देवकर – थोरात, राजेश बोराटे, एव्हरेस्टवीर श्रीहरी तापकीर, अलंकार हिंगे, सुनील जाधव – ससते इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# नव्या वर्षात महाविद्यालयांना 25 शासकीय सुट्या!

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून वर्ष 2025 मधील सुट्यांचे वेळापत्रक जाहीर

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालये, शैक्षणिक संस्थांना नवीन वर्षात अर्थात 2025 मध्ये 25 शासकीय सुट्या मिळणार आहेत. रविवारच्या साप्ताहिक सुट्टीचा दिवस वगळता या सुट्या असून, यातील प्रजासत्ताक दिन, गुढीपाडवा, रामनवमी, मोहरमच्या सुट्या रविवारी आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील वर्षातील सुट्यांचे नियोजन करता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




कोणत्याही शासकीय कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शनिवारी आणि रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळत असते. परंतु, त्याचबरोबर काही सार्वजनिक आणि शासकीय सुट्या देखील असतात. सुट्टीच्या दिवशी संबंधित कार्यालयाचे किंवा महाविद्यालयाचे कामकाज बंद असते.

विद्यापीठाच्या कार्यालयाला रविवारबरोबरच महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारी सुट्टी असते. त्यामुळे त्या दिवशी विद्यापीठाचे कामकाज बंद राहणार आहे.

### नऊ सुट्या जोडून आल्यामुळे 'दीर्घ सुटी'चे नियोजन

**» साप्ताहिक रविवारच्या सुटीला जोडूनच सोमवार, शनिवार किंवा शुक्रवारी सुटी आल्यास 'दीर्घ सुटी'चे नियोजन केले जाते. यंदा तब्बल नऊ सुट्या अशा येणार असल्याने विद्यार्थ्यांसह प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. या नऊपैकी तीन सोमवारी, एक शनिवारी आणि पाच शुक्रवारी आल्या आहेत.**

याव्यतिरिक्त महाविद्यालयांना उन्हाळी सुट्यांबरोबरच दिवाळीदरम्यानही सुट्या असतात. त्यामुळे पुढील वर्षी सर्वाधिक सुट्यांचा आनंद घेता येणार आहे. विद्यापीठाने वर्ष 2025 मधील शासकीय सुट्यांचे परिपत्रक जाहीर केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयाला संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या सुट्या लागू होतील. तसेच, महाविद्यालय किंवा संस्थेला जाहीर सुट्यांपैकी काही सुट्या देता येणे शक्य नसल्यास त्याबदल्यात सोयीनुसार पर्यायी सुटी देता येणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# झाकणांमुळे होतोय जीव 'वर-खाली'

## सांडपाणी वाहिन्यांची झाकणे खाली आणि रस्ता वर : वाहनचालकांना त्रास

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अनेक रस्त्यांवर सांडपाणी आणि पावसाळी वाहिन्यांची झाकणे रस्त्याला समतल नसल्याने अशी झाकणे असलेल्या काही रस्त्यांवर खड्डे, तर काही रस्त्यांवर उंचवटे निर्माण झाले आहेत. वाहनचालकांना याचा त्रास होत असून, काही भागांत यामुळे अपघातदेखील झाले आहेत.

शहरात तब्बल १६०० किलोमीटरचे रस्ते असून, दर वर्षी महापालिकेच्या पथ विभागाकडून विविध कारणांसाठी या रस्त्यांची दुरुस्ती केली जाते. शहरात जलवाहिनी, सांडपाणीवाहिनी, तसेच एमएनजीएलची वाहिनी व केबल टाकण्यासाठी रस्त्यांची खोदाई केली जाते, तर काही भागांत नवीन रस्ते तयार करताना जुने रस्ते खोदले जातात. यासाठी महापालिका दर वर्षी कोट्यवधी रुपये खर्च करते.



रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदारांमार्फत शेकडो कोटी रुपयांचा निधी खर्च केला जातो. जुन्या रस्त्यांची दुरुस्ती करताना सांडपाणी वाहिन्यांची झाकणे एक तर खाली जातात किंवा रस्त्याच्या उंचीपेक्षा वर येतात. रस्ते दुरुस्तीची कामे करताना अनेकदा झाकणांची उंची कमी न करता ठेकेदारांकडून तसाच रस्ता तयार केला जातो. यामुळे शहरातील अनेक भागांत 'सांडपाणी वाहिन्यांची झाकणे खाली आणि रस्ता वर' असे चित्र पाहायला मिळत आहे.

ठेकेदारांनी काम केल्यानंतर, झालेले काम योग्य आहे, की अयोग्य हे पाहण्याची जबाबदारी महापालिकेच्या पथ विभागातील अधिकाऱ्यांची असते. मात्र, तसे घडते की नाही असा प्रश्न पडावा, अशी स्थिती आहे. कारण, अनेक वाहने अशा खड्ड्यांमध्ये आदळतात आणि अपघातांचे प्रकार घडतात. यामध्ये वाहनचालकासह संबंधित वाहनांचेही मोठे नुकसान होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.

### कोणत्या भागांत त्रास?

**» सदाशिव पेठेतील ज्ञानप्रबोधिनी जवळील रस्त्यावरील सांडपाणी वाहिनीची लोखंडी जाळी तुटली आहे.**

**» लोकमान्यनगर, धनकवडी, चव्हाणनगर, पद्मावती, अरण्येश्वर, पर्वती परिसर, शिवदर्शन, बाजीराव रस्ता, सदाशिव पेठ, नारायण पेठ, शनिवार पेठ अशा विविध भागांत सांडपाणी वाहिन्यांवरील झाकणे खराब झाली आहेत.**

शहरातील रस्त्यांवर मध्यभागीच सांडपाणी वाहिन्यांची कामे करण्यात आली आहेत. काही ठिकाणी ही झाकणे सिमेंट काँक्रिटची, तर काही ठिकाणी लोखंडी आहेत. रस्त्याच्या उंचीच्या तुलनेत कमी-अधिक उंचीवर असल्याने वाहने चालविताना त्रास सहन करावा लागतो. रस्त्यामध्ये खाली-वर असलेल्या झाकणांमुळे झटका बसतो आणि पाठदुखी, मानदुखी होते, अशी तक्रार नोकरदार असलेल्या रवींद्र पवार यांनी केली.

रस्त्यापेक्षा उंच किंवा खाली गेलेल्या सांडपाणी वाहिन्यांच्या झाकणांमुळे अपघात होण्याची शक्यता असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आल्या होत्या. शहरातील सर्व भागांतील झाकणांचे सर्वेक्षण करण्यात आले असून, त्याची दुरुस्ती करण्याचे काम सुरू आहे. हे काम १५ जानेवारीपर्यंत पूर्ण होईल, असे पुणे महानगरपालिकेचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.

# महिलांच्या स्वावलंबनासाठी अत्याधुनिक शिलाई केंद्र

## शिवणकामावर भर देऊन उत्पादनाची गुणवत्ता वाढवावी : प्रदीप जांभळे पाटील यांचे आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पारंपरिक शिवणकामापेक्षा बाजारपेठेतील मागणी ओळखून त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण घेऊन अत्याधुनिक पद्धतीच्या शिवणकामावर भर देऊन उत्पादनाची गुणवत्ता अधिकाधिक वाढवावी. तसेच जास्तीत जास्त महिलांनी महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या शिलाई केंद्राचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, बीएमसी सॉफ्टवेअर इंडिया आणि थिंक शार्प फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भोसरी येथे शिलाई केंद्राची उभारणी करण्यात आली असून या केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उपायुक्त राजेश आगळे, साहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, बीएमसी सॉफ्टवेअर इंडियाचे सीएसआर हेड चावला दिवानजी, व्यवस्थापक गिरीश के., थिंक शार्प फाऊंडेशनचे संतोष फड, आकाश देवकर, अमित कोतवाल यांच्यासह टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्हस ट्रस्ट (टाटा स्ट्राइव्ह) सक्षमा उपक्रमाचे सदस्य तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे म्हणाले, महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी तसेच त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यास महिलांचाही उत्तम प्रतिसाद मिळत असून ही समाधानकारक बाब आहे. महिलांमध्ये असणाऱ्या विविध कलागुणांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांना स्वावलंबी करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. त्याच धर्तीवर महापालिका आणि बीएमसी सॉफ्टवेअर इंडिया आणि थिंक शार्प फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिलाई केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. ज्या महिलांना शिलाई मशिनसाठी भांडवल तसेच जागा उपलब्ध नाही अशा महिला शिलाई केंद्रात उपलब्ध असणाऱ्या शिलाई मशिनवर काम करू शकतात. तसेच ज्या महिलांना प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास त्या महिलांना योग्य प्रशिक्षणाची व्यवस्थाही या ठिकाणी करण्यात येणार असल्याची माहिती जांभळे पाटील यांनी दिली.

अत्याधुनिक पद्धतीच्या शिवणकामाचे प्रशिक्षण घेतल्यास बाजारपेठेत जास्त मागणी असलेल्या गोष्टी तयार करण्याचे कसब विकसित होईल. तसेच हे शिलाई केंद्र उत्तम पद्धतीने चालवण्यास मदत होईल, असे मत जांभळे पाटील यांनी व्यक्त केले. शिलाई केंद्रातील रेखा सोमवंशी यांनी आपले मत व्यक्त करताना महापालिकेचे आभार मानले. त्या म्हणाल्या, 'बऱ्याच महिलांना शिवणकला अवगत असते तर काही महिलांना शिवणकलेची आवड असते. परंतु, ज्या महिलांची आर्थिक परिस्थिती बेताची असते अशा महिलांना इच्छा असूनदेखील शिलाई मशिन घेणे शक्य होत नाही. महापालिका आमच्यासारख्या गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जी मदत करत आहे त्यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढला असून त्या स्वावलंबी बनत आहेत. महापालिकेने आम्हाला पाठबळ दिले तसेच आम्हाला उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. जोमाने काम करून मिळालेल्या संधीचे आम्ही सोने करू', अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

दरम्यान, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी शिलाई केंद्राची पाहणी केली. यावेळी महिलांनी त्यांनी बनवलेल्या कापडी वस्तू दाखवल्या. तसेच काही महिलांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निराकरण जांभळे पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी केले, तर सूत्रसंचालन पौर्णिमा भोर यांनी केले.

# पिंपरी न्यायालयात 1,132 प्रकरणे लोकअदालतीत निकाली

## पिंपरी नेहरुनगर न्यायालयात दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे एकूण 238 खटले निकाली



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी न्यायालय, पुणे जिल्हा विधी प्राधिकरण आणि पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशन यांच्या वतीने राष्ट्रीय लोकअदालतचे शनिवार (दि. १४) रोजी पिंपरी न्यायालय नेहरुनगर येथे आयोजन करण्यात आले होते.

पिंपरी नेहरुनगर न्यायालयात दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे एकूण २३८ खटले निकाली काढण्यात आले. त्यामुळे १ कोटी ७२ लाख ७३८ रुपये किमतीचे दावे निकाली निघाले, तर आकुर्डी न्यायालयात येथे दाखलपूर्व पाणीपट्टी व मिळकतकराची एकूण ८९४ खटले निकाली काढण्यात आले. त्यामध्ये १ कोटी ५४ लाख २३ हजार ८२ रुपये महसूल जमा झाला. वाहतूक चलनाच्या प्रकरणात ६२ हजार २००/- दंड जमा झाल्याने एकूण ३ कोटी २६ लाख ८६ हजार २० रुपयांचा महसूल दंड स्वरूपात शासनाच्या तिजोरीत जमा झाला आहे. यामध्ये पिंपरी नेहरुनगर न्यायालयाचे यांनी तर पॅनल ॲडव्होकेट म्हणून ॲड. विवेक राऊत, ॲड. अस्मिता पिंगळे, ॲड. निधी बारमेडा व ॲड. बरखा पालवे यांनी कामकाज पाहिले. कार्यक्रमाची सुरुवात पिंपरी न्यायालयातील उपस्थित न्यायाधीश व पिं. चिं. ॲड. बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. याप्रसंगी प्रमुख न्यायाधीश गजभिये यांनी उपस्थित वकील व पक्षकारांना लोकअदालतीचे महत्त्व सांगत मार्गदर्शन केले. यावेळी राणी पुतळाबाई महिला विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व प्राध्यापक, नागरिक व मोठ्या प्रमाणात वकील बांधव उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष ॲड. गौरव वाळुंज, सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रीना मगदूम, सहसचिव ॲड. राकेश जैद, खजिनदार ॲड. अक्षय फुगे, सदस्य ॲड. मानसी उदासी, ॲड. संकेत सरोदे, ॲड. विकास शर्मा, ॲड. संघर्ष सूर्यवंशी यांनी केले.

### सख्ख्या भावांमधील वाद मिटला

**» तब्बल दोन वर्षांहून अधिक काळ सुरू असलेल्या दोन साख्या भावांमधील वाद अखेर संपुष्टात आला. न्यायप्रलंबीत असलेला एक दिवाणी दावा व एक फौजदारी प्रकरण सामंजस्याने मिटवले. या दोघा भावांमध्ये दिवाणी दावा तसेच कुलमुखत्यारपत्राअन्वये खरेदीखत रद्दबाबत खटला सुरू होता. लोकअदालतमध्ये एकत्रित येऊन सामंजस्याने वाद मिटवण्याचे दोघांमध्ये ठरले. या दोन्ही प्रकरणांमध्ये ॲड. योगेश थंबा-कव्हेकर व वादी तथा फिर्यादी यांच्या वतीने ॲड. उज्ज्वला पिलाने यांनी राष्ट्रीय लोकअदालतीचे औचित्य साधून त्यावर तोडगा काढून प्रकरण निकाली काढले. दोघांच्या समजुतीने दोन्ही दिवाणी व फौजदारी प्रकरण निकाली काढण्यात आले.**

# वाळूच्या बेकायदा उपशावर ड्रोनची 'नजर'

## दौंड, बारामती, इंदापूर, जुन्नर, आंबेगाव, शिरूर भागातील नदीमध्ये ड्रोनद्वारे पाहणी केली जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात नदी नाल्यांमधून बोटींमधून रात्री वाळूचा बेकायदा उपसा तसेच तस्करी रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता ड्रोनद्वारे नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी दोन ड्रोन जिल्हा प्रशासनाने उपलब्ध करून दिले असून मागणी आणि गरजेनुसार त्याचा वापर बारामती, इंदापूर, दौंड तसेच आंबेगाव, जुन्नर भागात केला जाणार आहे. त्यामुळे वाळूमाफियांना चाप बसणार आहे.



राज्य सरकारने सामान्यांना माफक दरात वाळू मिळावी यासाठी धोरण आखले आहे. त्यानुसार प्रतिब्रास सहाशे रुपये दराने वाळूची विक्री केली जात आहे. त्यासाठी जिल्ह्यात सुमारे २६ ठिकाणी ठेके देण्यात आले आहेत. तरीही वाळूचा बेकायदा उपसा सुरू असून त्याद्वारे वाळूची तस्करी केली जात आहे. दिवसा किंवा रात्री नदीतून बोटीद्वारे वाळूचा उपसा केला जातो. मात्र, उपसा केलेल्या वाळूचा साठा नदीकाठच्या झाडाझुडपांत लपविला जातो किंवा शेजारील शेतांमध्ये ठेवला जातो. तसेच तेथेच ट्रकही लपविले जातात.

> जिल्ह्यात नदी, नाले असलेल्या दौंड, बारामती, इंदापूर, जुन्नर, आंबेगाव भागात ड्रोनच्या माध्यमातून वाळू चोरट्यांवर नजर ठेवली जाणार आहे. ड्रोनद्वारे नदीतील बेकायदा वाळू उपसावर लक्ष ठेवले जाईल.
>
> **- सुहास मापारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी.**

त्या जागेपर्यंत महसूल विभागातील तहसीलदारांसह अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांना पोहोचता येत नाही. त्यामुळे वाळूचोरी रोखता येत नाही. ही चोरी पकडण्यासाठी तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता ड्रोनचा वापर सुरू केला आहे. त्यासाठी दोन ड्रोन घेतले असून त्याद्वारे आता नदी नाल्यांवर नजर ठेवली जाणार आहे.

दौंड, बारामती, इंदापूर, जुन्नर, आंबेगाव, शिरूर या भागातील नदी, नाल्यांमध्ये ड्रोनद्वारे पाहणी केली जाणार आहे. स्थानिक अधिकाऱ्यांकडून माहिती संकलित केली जाणार आहे. त्यामुळे चोरी करणाऱ्या माफियांना पकडणे शक्य होईल. त्याशिवाय अन्य ठिकाणी मुरूम, दगड आणि माती यांची होणारी चोरीदेखील पकडण्यास ड्रोनचा वापर केला जाणार आहे. त्याची अंमलबजावणी नुकतीच सुरू झाली आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाने एका कंपनीची नियुक्ती केली आहे.

# भूसंपादनाचे खरेदीखत चार दिवसात करा

## कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी जागामालकांसोबत झालेल्या बैठकीत महापालिका आयुक्तांनी दिल्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाचे काम गेल्या भूसंपादनाअभावी आणि संथ गतीने चाललेल्या कामामुळे अनेक दिवसांपासून रखडले आहे. येत्या चार दिवसात जागेचे खरेदीखत करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी प्रशासनाला दिले आहेत.



या रस्त्याचे रुंदीकरण रखडल्यामुळे कात्रजकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरील वाहनांची मोठी वर्दळ असल्याने अपघात होत असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे. याची दखल घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून या रस्त्याच्या कामाचा आढावा घेतला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर या रस्त्याचे काम वेगाने करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे महापालिकेकडून रस्त्यासाठी आवश्यक असलेली जागा ताब्यात घेण्याचे काम वेगाने केले जात असून मोबदला देण्याचे हमीपत्र देऊन जागा ताब्यात घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे येत्या चार दिवसात जागेचे खरेदीखत करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले आहेत.

शहराच्या दक्षिण भागातील वाहतूक सुधारण्यासाठी कात्रज - कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या रस्त्यावर वाहतूक कोंडी सातत्याने होत आहे. तसेच जड वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे महापालिकेकडून ८४ मीटर रस्ता रुंदीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. या रस्त्याच्या कामासाठी राज्य सरकारकडून निधी मिळाला आहे. प्रामुख्याने कात्रज येथील राजस सोसायटी ते कोंढवा येथील खडी मशिन चौक या दरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. या कामाला ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी मान्यता मिळाली असून या भूसंपादन न झाल्याने रस्त्याचे काम रखडले आहे. या रस्त्यांच्या भूसंपादनासाठी ७१० कोटी हवे आहेत. राज्य सरकारकडून १४० कोटी रुपयांचा निधी महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. या निधीचे जागामालकांना वाटप केले जाणार आहे. काही भागात काम झाले असून, ग्रेड सेपरेटरचे काम सुरू आहे. जेथे जागा ताब्यात आल्या तेथे रस्ता बांधला जात आहे. रस्ता तुकड्या तुकड्यात कात्रज-कोंढवा रस्त्याचे काही प्रमाणात टीडीआर देऊन भूसंपादन झाले आहे. त्यामुळे हा रस्ता तुकड्या तुकड्यामध्ये तयार आहे. रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या भूसंपादनाअभावी रस्त्याचे काम रखडले आहे.

दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सदर रस्त्याची रुंदी ८४ मीटर करावी अशी सूचना केली होती. त्या सूचनेनुसार महापालिकेने आता सदर रस्त्याचे ८४ मीटरपर्यंत रुंदीकरण करण्यासाठी कार्यवाही सुरू केली आहे, अशी माहिती आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली.

### हमीपत्र देण्याच्या अटीवर जागा घेणार ताब्यात

» वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी महापालिकेने रस्त्याच्या ५० मीटर रुंदीकरणाचे काम हाती घेतले होते. परंतु त्यात आता प्रशासनाने पुन्हा बदल करून ८४ मीटर रुंदीचा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू केली आहे. त्यासाठी भूसंपादन करणे आवश्यक आहे. जागा ताब्यात घेण्याबाबत महापालिका आयुक्तांच्या दालनात सहा ते सात जागामालकांची बैठक सोमवारी (दि. १६) पार पडली. कात्रज चौकात उड्डाण पुलाचे काम सुरू केले आहे. या कामामुळे वाहतूक बंद करण्यात आली आहे. मात्र कात्रज-सातारा रस्त्यावरून सर्व्हीस रस्ता केल्याशिवाय पुलाचे काम करता येणार नाही. त्यामुळे भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्यामुळे जागामालकांकडून जागा ताब्यात घेण्यासाठी चर्चा केली जात असून आयुक्तांच्या सहीचे हमीपत्र दिले जाणार आहे. त्यानंतर तत्काळ जागा ताब्यात घेतली जाणार आहे.